वाचा :-१) श्री.चंद्रभान भिमसिंग ठाकूर व इतर १, रा. कोरेगाव मुळ, ता. हवेली, जि. पुणे यांचा दिनांक २८/६/२०११ व दि.२५/७/२०११ रोजीचा अर्ज.

२) मा.आयुक्त,पुणे विभाग यांचेकडिल परिपत्रक क्र.मह-२/जमीन/आरआर/७७२/०३, दि.२२/९/०३.

३) सहा.संचालक, नगर रचना, पुणे यांचेकडिल जा.क्र.एनएबीपी/मौ.कोरेगांव मूळ/ता.हवेली /ग.नं.३९३(पै.)/ससंपु/६३६४, दिनांक २१/९/२०११.

४) प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समुह, पुणे यांचेकडील दिनांक ३ मे, २०११ रोजीचे पत्र.

५)पर्यावरण विभागाकडील पत्र क्रमांक इएनव्ही-२०१०/प्र.क्र.१४४/ता.क्र.३,दिनांक ०५/०२/२०११.

६)महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम १८.

७)नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र.नाजक २२११/प्र.क्र.१३८/नाजकधा-२दि.७/०६/२०११

८) या कार्यालयाकडील आदेश क्रं.पमह/एनए/एसआर/६९८/०८, दि.१६/०२/२००९.

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे.
(महसूल शाखा)
क्र.पमह/एनए/एसआर/७९८/११
पुणे, दिनांक - ६ /७/२०१२

विषय :- मौजे कोरेगाव मूळ,ता.हवेली, जि.पुणे येथील गट नंबर ३९३ मधील क्षेत्र १५७१-३१ चौ.मी. पैकी रस्त्याखालील क्षेत्र २२४-०९ चौ.मी. वजा जाता १३४७-२२ चौ.मी. पैकी २०-५३ चौ.मी.वाणिज्य व १३२६-६९ चौ.मी. क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ अन्वये सुधारित रेखांकन/बांधकाम नकाशास मंजुरी देणेबाबत.

आदेश,

श्री.चंद्रभान भिमसिंग ठाकूर, रा. कोरेगाव मूळ, ता.हवेली, जि.पुणे यांनी दिनांक २८/६/२०११ व दि.२५/७/२०११ रोजी निवासी व वाणिज्य प्रयोजनार्थ सुधारित रेखांकन व बांधकाम नकाशांस परवानगी मिळणे कामी या कार्यालयाकडे विनंती अर्ज सादर केला आहे. या कार्यालयाकडील आदेश क्रं.पमह/एनए/एसआर/६९८/०८, दि.१६/०२/२००९ अन्वये मौजे कोरेगाव मूळ, ता. हवेली, जि. पुणे येथील ग.नं.३९३ मधील १६००-०० चौ.मी. निवासी क्षेत्रास अकृषिक परवानगीसह रेखांकनास परवानगी देण्यात आलेली आहे.सदर पूर्व मंजुर परवानगी नुसार ग.नं. ३९३ मध्ये २०-५३ चौ.मी. वाणिज्य व १३२६-६९ चौ.मी. निवासी प्रयोजनार्थ बांधकाम नकाशास मंजुरी मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहा.संचालक नगर रचना, पुणे शाखा पुणे यांनी दि.१६/२/२००९ रोजीच्या पत्रान्वये सुधारित रेखांकन/बांधकाम आराखडयास मंजुरी देणेबाबत शिफारस केलेली आहे.

मौजे कोरेगाव मूळ, ता.हवेली, जि.पुणे येथील खालील वर्णनाची जमिन श्री.चंद्रभान भिमसिंग ठाकूर व नंदा चंद्रभान ठाकुर यांचे नांवे हक्कनोंदणीस दाखल असल्याचे दिसुन आले आहे.

| अ क्र | मुळ जमीन मालकाचे नाव | ग. नं. | ७/१२ प्रमाणे क्षेत्र (चौ.मी.) | अकृषिक परवानगी मागणीक्षेत्र (चो.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. चंद्रभान भिमसिंग ठाकूर<br>सौ नंदा चंद्रभान ठाकुर | 393 | १६००-०० | १६००-०० |
| २ | हक्कनोंदणी प्रमाणे एकुण क्षेत्र | | १६००-०० | १६००-०० |
| ३ | अर्जदार यांनी रेखांकन नकाशात समाविष्ठ केलेले क्षेत्र | | | १५७१-३१ |
| ४ | रस्ता रुंदीने व्याप्त क्षेत्र रोड वायडींग | | | २२४-०९ |
| ५ | संपादनाखालील क्षेत्र | | | ०००-०० |
| ६ | रेखांकन नकाशामध्ये समाविष्ठ करण्याचे क्षेत्र | | | १३४७-२२ |
| ७ | बिनशेती करावयाचे वाणिज्य क्षेत्र | | | २०-५३ |
| ८ | बिनशेती करावयाचे निवासी क्षेत्र | | | १३२६-६९ |
| ९ | रेखांकनाचे प्रयोजन | | | निवासी+ वाणिज्य |

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या सर्व हक्कनोंद उतारे, वन विभागाकडिल राखीव वनाची यादी, तहसिलदार कार्यालय हवेली यांचा स्थळपाहणी अहवाल व कार्यालयातील ॲलिनेशन रजिस्टर मधील नोंदी यावरुन दिसून येते की,

१. विषयांकीत जमिन श्री.चंद्रभान भिमसिंग ठाकुर व सौ.नंदा चंद्रभान ठाकुर यांचे नांवे हक्कनोंदणीस दाखल असून त्यांनी बांधकाम नकाशास मंजुरी मिळणेकामी अर्ज सादर केला आहे.

२. या कार्यालयातील ॲलिनेशन रजिस्टरमधील नोंदनुसार विषयांकित जमीन वतन/इनाम नाही.

३. वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांचेकडील पत्र क्रं. कक्ष-६/जमीन/११५/२००९-१०,दिनांक १४ मे, २००९ रोजीच्या उपलब्ध यादी व सीडीचे अवलोकन करता सदरची जमीन ही वनसंवर्गापैकी नाही.

४. तहसिल कार्यालय हवेली यांचेकडील दाखला क्रं. बिनशेती/कावि/३४५०/२०११, दि.३०/१२/२०११ अन्वये प्रस्तावित क्षेत्रातुन उच्च दाबाची विद्युत वाहिनी जात नसल्याचे नमूद केलेले आहे.

५. जागेवर अर्जदार यांनी बांधकाम सुरु केले नसलेचे तहसिलदार कार्यालय हवेली यांचेकडील पत्र क्रं.बिनशेती/कावि/३४५०/२०११, दि.३०/१२/२०११ रोजीच्या अहवालामध्ये नमुद केले आहे.

६. विषयांकित जमिनीला नागरी जमिन (कमाल धारणा व विनियमन ) अधिनियम १९७६ मधील तरतुदी लागू होत नाहीत.

सहा.संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांचे कडील जा.क्र.एनएबीपी/मौ.कोरेगांव मूळ / ता.हवेली/ग.नं.३९३ (पै.)/ससंपु/६३६४, दि.२१/९/२०११ अन्वये सुधारित रेखांकन व त्यामधील बांधकाम नकाशे मंजुरीची शिफारस केली आहे.

मा.आयुक्त,पुणे विभाग,पुणे यांचेकडिल परिपत्रक क्र.मह-२/जमीन/जनरल/आरआर/७७२/२००३, दिनांक २२/०९/२००३ मधील तरतुदीनुसार अर्जदार यांनी दिनांक १६/३/२०१२ रोजीचे विहीत नमुन्यातील नोटराईजड करुन प्रतिज्ञापत्र व क्षतिपत्र सादर केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये विषयांकित

जमिनीबाबत खालील नमुद केलेल्या कोणत्याही कायदयाच्या तरतुदीचा भंग झालेला नाही असे विशद केले आहे.

१. मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम,१९४८.
२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.
३. महाराष्ट्र शेत जमीन,(जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम,१९७६.
४. इनाम जमीनी खालसा करण्यासाठीचे निर्गमित केलेले विविध कायदे.
५. मुंबई तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व जमीन एकत्रिकरण करणे अधिनियम,१९४७.
६. महाराष्ट्र खाजगी वने (भू-संपादन) अधिनियम,१९७५.
७. महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमीनी प्रत्यार्पित करणे अधिनियम,१९७४.
८. नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम,१९७६.
९. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम, १९८६.

उपरोक्त नमुद कायदयातील तरतुदीचा भंग होत नसलेचे तसेच विषयांकित जमीन वर्ग-२ पैकी नसलेचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे.

सुधारित प्रस्तावाची सर्वसाधारण कारणे-

सहायक संचालक नगररचना पुणे शाखा पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.एनएबीपी/मौजे-कोरेगांव मूळ/ ता.हवेली/ग.क्र.३९३पै./संसपु/२६६७, दि.१/६/२०११ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ४४ अंतर्गत मंजूरीची शिफारस केलेली होती. आता सुधारित बाधंकाम नकाशांना मंजूरी अपेक्षिलेली आहे.

अर्जदार यांनी निवासी प्रयोजनासाठी १३४७-२२ चौ.मी. क्षेत्रासाठी रु. ०.७८४ प्रती चौ.मी. या दराने या कार्यालयाकडील आदेश क्रं.पमह/एनए/एसआर/६९८/०८,दि.१६/०२/२००९ अन्वये बिनशेती आकारणी रक्कम व मोजणी फी रक्कम भरलेली आहे.

वरील परिस्थिती विचारात घेता, अर्जदार यांना निवासी व वाणिज्य वापरासाठी सुधारित रेखांकन/बांधकामास परवानगी मिळणेस पात्र आहेत. म्हणून, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रदान करणेत आलेल्या शक्तीनुसार मी, विकास देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे अर्जदार श्री.चंद्रभान भिमसिंग ठाकूर व इतर १ यांना १५७१-३१ चौ.मी. क्षेत्रापैकी रस्त्याखालील क्षेत्र २२४-०९ चौ.मी. वजा जाता १३४७-२२ चौ.मी. पैकी २०-५३ चौ.मी. क्षेत्राकरिता वाणिज्य प्रयोजनार्थ व १३२६-६९ चौ.मी. क्षेत्राकरीता निवासी प्रयोजनार्थ सहा.संचालक नगररचना पुणे शाखा पुणे यांजकडील जा.क्रं.एनएबीपी/मौ.कोरगांव मूळ/ता.हवेली/ ग.नं. ३९३पै./ससंपु/६३६४, दि.२१/९/२०११ मधील शिफारसीस अधिन राहून खालील कोष्टाकात नमूद मिळकतीवर निवासी व वाणिज्य प्रयोजनार्थ सुधारित रेखांकन/बांधकाम आराखडयास मंजुरी देत आहे.

**सुधारित अकृषिक परवानगी मंजुर करावयाच्या जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | तालुका | ग.नं. | क्षेत्र(चौरस मीटर) |
|---|---|---|---|
| कोरेगांव मूळ | हवेली | ३९३ | ७/१२ प्रमाणे क्षेत्र १६००-००<br>एकूण क्षेत्र- १६००-००<br>रेखांकनामध्ये समाविष्ट केलेले क्षेत्र-१५७१-३१<br>रस्त्याखालील बाधीत क्षेत्र- २२४-०९<br>परवानगीचे क्षेत्र- १३४७-२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वाणिज्य प्रयोजनार्थ क्षेत्र- २०-५३<br>निवासी प्रयोजनार्थ क्षेत्र- १३२६-६९ |
| | | | अकृषिक परवानगीचे प्रयोजन - निवासी+ वाणिज्य |

**सुधारित रेखांकन / बांधकाम आराखडयातील नकाशांचा तपशिल**

| अ.क्र. | नकाशा क्रमांक | नकाशाचा तपशिल |
|---|---|---|
| १ | १/२ | क्षेत्रगणना नकाशा, स्थलदर्शक नकाशा, वाहनतळ नकाशा, तळ मजला नकाशा, पहिला/तिसरा मजला, दर्शनी मजला नकाशा, छेद नकाशा इ. |
| २ | २/२ | पहिला/दुसरा/तिसरा मजला नकाशा, चौथा मजला नकाशा इ. |

अटी व शर्ती

१. वरील जागेचा व नियोजित इमारतीचा वापर नकाशातील तळमजल्यावरील ३ पेटी शॉप या वाणिज्य वापराव्यतिरिक्त फक्त रहिवास वापरासाठी करण्यात यावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

२. स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम ठेवणे आवश्यक असून सदर जागा कायम खुली ठेवावी.

३. नियोजित बांधकामाचे, भूखंडातील अस्तित्वातील अन्य बांधकाम धरुण एकूण क्षेत्र, नकाशावर दर्शविल्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर कमाल राहिले पाहीजे

४. नियोजित बांधकामातील मजल्यांची संख्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे वाहनतळ+चार मजले व तळ मजला या पेक्षा जास्त असू नये.

५. नियोजित इमारतीसाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहीजे.

६. विषयाधीन जागा पुणे-सोलापूर या राष्ट्रीय मार्गावर सन्मुख असून वापरानुषंगाने रस्ता मध्यापासून बांधकाम नियंत्रण रेषेच्या अंतराबाबत संबंधित विभागाचे ना हरकत घेणे अर्जदारावर बंधनकारक आहे व त्यातील अटी व शर्ती अर्जदार यांना बंधनकारक राहतील. तसेच जोड रस्तेबाबत ना हरकत घेणेत यावे बाधित होणारे क्षेत्र सार्वजनिक वापरासाठी खुले ठेवावे. समुचित प्राधिकरणाने मागणी केल्यास सदरचे क्षेत्र विनातक्रार सुयोग्य प्राधिकरणास अर्जदार यांना देणे बंधनकारक राहील.

७. जागा पाहणी व प्रस्तावासोबतच्या उपलब्ध कागदपत्राच आधारे या कार्यालयाने मंजूरी शिफारस केली आहे. प्रत्यक्ष जागेवर बिगरशेती आदेशापूर्वी बांधकाम सुरु केल्यास सदरची शिफारस रद्द समजण्यात यावी.

८. नियोजित बांधकामात मंजूरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

९. प्रकाश व वायुविजन यासाठी ठेवलेल्या खिडक्यांचे क्षेत्र हे त्या संबंधित खोलीच्या १/८ पेक्षा कमी असू नये.

१०. नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणाच्याही वहीवाटीचे हक्काचा भंग होणार नाही यांची जबाबदारी अर्जदार/मालकाने घेतली पाहीजे.

११. विषयांकित रेखांकन व बांधकाम नकाशांची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असणाऱ्या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. (७/१२ उतारे, कुळमुखत्यारपत्र, संमत्तीपत्र, मोजणी नकाशा इ.) या कागदपत्रांच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत अर्जदार जबाबदार राहतील.
१२. विषयांकित बांधकाम नकाशाची छाननी, अनुज्ञेय चटई क्षेत्र, भुव्याप्त क्षेत्र याबाबतीत केलेली आहे. बांधकाम नकाशातील गणितीय चुका वा जागेवर बांधकाम नकाशावर नमुद केल्या व्यतिरिक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबंधित वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.
१३. सदर भूखंडाचे बांधकाम क्षेत्रफळ ५००-०० चौ.मी. पेक्षा जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक ८०-०० चौ.मी. क्षेत्रासाठी एक झाड या प्रमाणे वृक्षलागवड करणे व जोपासना करणे बंधनकारक राहील.
१४. या कार्यालयाने यापूर्वी या प्रकरणात दि.०१/०६/२०११ रोजीचे पत्र क्रमांक एनएबीपी/मौजे कोरेगांव मूळ/ता.हवेली/ग.क्रं.३९३पै./संसपु/२६६७ ने केलेली शिफारस रद्द समजण्यात यावी.
१५. स्टिल्ट भविष्यात बंदिस्त करण्यात येऊ नये. तसेच स्टिल्टचा वापर फक्त पार्किंगसाठीच करण्यात यावा.
१६. प्रादेशिक योजना-रस्त्याने/रस्तारुंदीने बाधीत क्षेत्र सार्वजनिक वापरासाठी कायमस्वरुपी खुले ठेवणे आवश्यक राहील व समुचित प्राधिकरणाने ही जागा मागणी केल्यानंतर ती विनातक्रार, प्राधिकरणाच्या ताब्यात देणे अर्जदारावर बंधनकारक राहील.
१७. रेनवॉटर हार्वेस्टिंग बाबतची यंत्रणा अर्जदार यांनी इमारतीचे वापरापूर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.
१८. सौर ऊर्जेवर पाणी तापविण्यासाठीची यंत्रणा अर्जदार यांनी इमारतीचे वापरापूर्वी स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच शक्यतर सौर ऊर्जेवर रस्त्याच्या पथदिवे बसविण्याचे आहेत.
१९. शासन नगर विकास विभागाकडील परिपत्रक्र क्र.टिपीव्ही-४३०८/४१०२/प्र. क्र.३५९/०८/नवि-११ नुसार दि.१९/११/२००८ नुसार बांधकाम नकाशामध्ये प्रत्येक सदनिकेचे एकुण चटई क्षेत्र नमूद केलेले आहे. याबाबत गणितीय चुका इ.बाबत वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.
२०. प्रस्तुत प्रकणातील जमीनीवर कोणतेही बांधकाम सुरु केले नंतर जोते तपासणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय पुढील बांधकाम करता येणार नाही व सदरचे बांधकाम पूर्ण झालेनंतर वापर सुरु करणेपूर्वी वर सर्व नमूद अटींची पूर्तता करुन भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार कारवाईस पात्र राहील.
२१. पुर्व मंजुरी प्रमाणे विकासक/जागा मालक यांनी काही सदनिका बाबत नोंदणीकृत करार केले असल्यास सदर करार धारकास रेखांकनातील अंतर्गत रस्ते, खुली जागा, सुविधा क्षेत्र व इमारतीचे अंतर्गत नियोजनाचे सुधारित मंजुरीबाबत अवगत करणेची व मूळ करारानुषंगाने कायद्यानुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करणेची संपुर्ण जबाबदारी विकासक/जागा मालक यांची राहील व त्यानुसार पूर्तता व्हावी लागेल. सुधारित मंजूरीबाबत करारधारकाकडून काही आक्षेप घेतल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी विकासक/जागा मालक यांची राहील.
२२. उक्त बिनशेतीसाठी प्रस्तावित जागेचे अथवा ग.नं.मधील उर्वरित जागेचे तकडे पाडुन अथवा गुंठेवारी प्रमाणे अनाधिकृतपणे भूखंड पाडता येणार नाहीत किंवा विक्री करता येणार नाही. अशा प्रकारे अनाधिकृतरित्या तुकडे पाडल्यास किंवा विक्री केल्यास ही परवानगी रद्द समजण्यात येईल.
२३. प्रकरणासोबत मो.र.नं. ९३७६/२००८, दि.०७/१०/२००८ रोजीचा मोजणी नकाशा सादर केलेला आहे. सादर केलेल्या मोजणी नकाशामध्ये सदरचा नकाशा वहिवाटीप्रमाणे असून त्यांचा भूमि

...धिकारी

अभिलेखामध्ये अंमल नाही असे नमूद आहे. हद्दीबाबत भविष्यात तफावत आढळलयास अर्जदार जबाबदार राहतील.

२४. अर्जदार यांनी जमीनीचा वापर त्यावरील इमारतीसह ज्या कारणासाठी दिला आहे, त्याच कारणासाठी करावा. जमीनीचा वापर अन्य कारणासाठी करावयाचा झाल्यास जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२५. जमीनीचा अकृषिक वापर या आदेशाचे दिनाकांपासून सुरु झाला असे समजणेत येत आहे.

२६. अर्जदार यांनी प्रतिवर्षी निवासी व वाणिज्य विषयांकित मिळकतीसाठी रु.००.१०/- प्रती चौ.मी. या दराने प्रती वर्षी अकृषिक सारा शासनास भरावा. सदर आकारणी तात्पुरत्या स्वरुपाची असून दिनांक १/८/२००६ ते सुधारित अकृषिक प्रमाणदर अंमलात आल्यानंतर फरकाची रक्कम असलेस ती शासनास जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

२७. प्रस्तुत जमीनीवर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने अकृषीक आकारणी दरवर्षी भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

२८. सदरची अकृषिक परवानगी, नागरी जमीन कमाल धारणा कायदा १९७६, मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८, मुंबई महानगरपालिका अधिनियम व इतर कायदयांचे तरतुदीस पात्र राहून देण्यात आली आहे.

२९. सदरच्या आदेशातील अकृषिक क्षेत्र व अकृषिक सारा यामध्ये उपअधीक्षक भुमी अभिलेख हवेली यांचेकडून प्रत्यक्ष मोजणी नंतर जो फेरबदल होईल तो करण्यास पात्र राहील.

३०. सदर आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्यास अर्जदार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्याखालील नियमानुसार दंडास पात्र राहील तसेच दिलेली अकृषिक परवानगी रद्द समजणेत येईल.

३१. अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती, शपथपत्र व बंधपत्र, हमीपत्र तसेच प्रतिज्ञापत्रात नमुद केलेली बाब अथवा कागदपत्रे ही चुकीची अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास प्रस्तुतची परवानगी रद्द समजणेत येईल.

(विकास देशमुख)
जिल्हाधिकारी, पुणे.

जिल्हाधिकारी
पुणे

प्रति,

श्री.चंद्रभान भिमसिंग ठाकुर व इतर १,
रा. कोरेगाव मूळ, ता. हवेली, जि-पुणे